१८३५

म. ग्रं. सं. ठाणें
विषय निबंध
सं. क्र. ३९६

REFBK-0005446

म. ग्रं. सं. ठाणें
ग्र निबंध
सं. नं. ३९५
१५१७३६

...त्कार्योत्तेजक सभा-धुळें

# श्रीसमर्थांचें अवतारकार्य

( देवांनीं योजिलेल्या श्रीसमर्थचरित्राचें केवळ दिग्दर्शन )

॥ रामराज्य करणें सर्वत्र हो ॥

१८५७ पौष शु. १५

एक आणा

# श्रीसद्गुरुसमर्थ-जांब



त्वरें सीघ्र ऊठोनि वेगीं चलावें। समर्था प्रभूलागिं भेटीसि यावें।
तरी सर्व ही सौख्य पावाल वेगीं। तुम्हा सूचना रे चळा सर्व बेगीं ॥

# श्रीसमर्थांचें अवतारकार्य

REFBK-0005446

…ाज्य करणें सर्वत्र हो ॥

प्रताप २०×७२

नेहमीं च, विशेषतः माघ वद्य नवमीच्या दिवशीं सर्वांना चिंतन करण्यास मदत व्हावी म्हणून श्रीसमर्थांच्या अवतारकार्याविषयीं माझी जी कल्पना आहे व जी मी शेंकडों ठिकाणीं, कोठें विस्तारानें तर कोठें संक्षेपानें प्रतिपादिली आहे, ती आज येथें थोडक्यांत सुचवून ठेवावी, असें मनांत आलें. कधीं काळीं माझ्या हातून श्रीसमर्थचरित्र लिहिलें गेलें तर त्याची ही एक प्रकारें रूपरेषा च होय.

श्रीसमर्थांचें अवतारकार्य काय, असा एकदा मी माझ्या मनाला प्रश्न केला. त्याचें उत्तर मनानें दिलें कीं, श्रीसमर्थचरित्रांत जी एकादी अपूर्व गोष्ट घडली असेल, जिला दुसऱ्या कोणाच्या चरित्रांत तोड आढळली न पाहिजे, अशी जी एकादी गोष्ट घडली असेल, तींत श्रीसमर्थांच्या अवतारकार्याचा शोध केल्यास लागण्यासारखा आहे. अशी एक अपूर्व गोष्ट घडली आहे, पण ती इतकी सर्वसामान्य झाली आहे कीं, त्या एका च गोष्टीवरून अखिल महाराष्ट्र श्रीसमर्थांना ओळखतो. गोष्ट अपूर्व तर खरी च, पण ती सर्वांनीं नेहमीं च ऐकलेली असल्यामुळें तिची अपूर्वता भासेनाशी झाली आहे. गोष्ट नेहमीं ऐकली आहे, हें विसरून जाऊन क्षणभर कृपा करून विचार करा, अवघे बारा वर्षांचें वय तें काय आणि ऐन लग्नघटिकेला ब्राह्मणांच्या मुखांतून निघालेला "सावधान" शब्द ऐकून श्रीसमर्थ सावध झाले, हा काय चमत्कार !

ऐसें कोठें नाहीं हो वर्तलें । पूर्वीं अवतारादिकांसी न जालें ।
मायामोहिनीनें ब्रह्मादिकां भुलविलें । नाना पुराणें आम्ही ऐकिलीं ॥
समर्थदेवें ख्याती केली । सांगायासी ऐकायासी गोष्टी जाली ।

आणि या च गोष्टींत श्रीसमर्थांचें अवतारकार्य सांठविलेलें असलें पाहिजे असें मला भासलें. समर्थांचें अवतारकार्य दुसरें तिसरें कांहीं नसून स्वतः सावध होऊन साऱ्या राष्ट्राला त्यांनीं सावध केलें आणि श्रीरामराज्याची पुनरपि महाराष्ट्रांत स्थापना केली, हें श्रीसमर्थांचें अवतारकार्य होय.

ही एक गोष्ट झाली. अशी च आणखी एक गोष्ट त्यांच्या चरित्रांत नमूद आहे. या वेळीं श्रीसमर्थांचें वय बारा वर्षांचें होतें, ती दुसरी गोष्ट त्यांच्या वयाच्या अकराव्या वर्षाची आहे. आपणा सर्वांस ठाऊक आहे कीं, औरंगाबाद जिल्ह्यांत, आंबड तालुक्यांत, जांब गांवीं शक १५३० त श्रीसमर्थांचा जन्म झाला. त्यांचें जें उपास्यदैवत त्या दैवताच्या जन्मतिथीला, इतकें च नव्हे तर बरोबर त्या घटिकापळाला श्रीसमर्थांचा जन्म व्हावा, ही हि केवढी अपूर्वता म्हणावयाची ! टळटळित दुपारा जन्मला रामराणा । आणि श्रीसमर्थांचा जन्म हि १५३० च्या चैत्र शु. ९ स बरोबर त्या च वेळीं झाला. जेथें त्यांचा जन्म झाला त्या जागीं आतां, त्या प्रसंगाचें स्मारक म्हणून, अखिल महाराष्ट्रानें श्रीसमर्थमंदिर उभारून त्यांत श्रीसमर्थांच्या अत्यन्त नयनमनोहर अशा मूर्तीची १८५४ चैत्र शु. ९ च्या मुहूर्तावर स्थापना केल्याचें वृत्त सर्वांना विदित आहे च. श्रीसमर्थांचें बालपण जांब गांवीं च गेलें. ते अकरा वर्षांचे असतां त्यांचे वडिल निवर्तले. वडिलांचें नांव सूर्याजीपंत होतें. त्यांच्या पाठीमागें श्रीसमर्थांच्या मातुःश्री होत्या. त्यांचें नांव राणुबाई. श्रीसमर्थांना एक च वडिल बंधु होते, त्यांचें नांव गंगाधर. समर्थांचें हि पाळण्यांतलें नांव निराळें होतें, तें नारायण होतें. हे नारायण ते गंगाधर, हे रामदास ते रामीरामदास, हे समर्थ आणि ते श्रेष्ठ. सूर्याजीपंतांकडे बारा गांवांचें कुळकर्णपण होतें. समर्थांच्या पेक्षां गंगाधर तरी अवघ्या तीन च वर्षांनीं वडिल होते. हे अकरा तर ते चवदा वर्षांचे होते. अशा अल्प वयांत बारा गांवांच्या कुळकर्णपणाचें काम पाहण्याची जबाबदारी त्यांच्या वर येऊन पडली. तेव्हां एके दिवशीं दोन्ही मुलांना जवळ घेऊन मातुःश्री राणुबाई बसल्या असतां धाकट्या नारायणाला त्या म्हणाल्या, बाळा नारायणा, गंगाधर तरी तुझ्यापेक्षां असा किती मोठा आहे, त्यास बारा गांवांचें काम पहावें लागतें, तेव्हां तूं कांहीं प्रपंचाची चिंता करीत जा. दुःखी झालेल्या मातेचे हे शब्द नारायणबाळानें हृदयांत सांठविले आणि कोणास न कळत घरांतील बाळंतिणीच्या खोलींत जाऊन तो अंधारांत आसनस्थ चिंता करीत बसला. तिन्ही सांजा झाल्या, नारायण कोठें गेला, तो अजून कसा घरीं आला नाहीं, अशी आईला चिंता वाटली. येईल असें वाटून त्या कामास लागल्या. अडगळीच्या खोलींत त्या कांहीं आणण्यास गेल्या तों त्यांचा पाय ध्यानस्थ बसलेल्या नारायणास लागला आणि ' कोण रे आहे येथें ' म्हणून त्यांनीं विचारिलें. ' मी नारायण ' असें नारायणानें उत्तर दिलें. अरे नारायणा,

स्थळ प्रत
सं.........नं.........
ता.........
डा. जे.

बापा काय हें करितोसी येकांतस्थळीं ।

असें आई विचारिते. कांहीं प्रपंचाची चिंता करीत जा म्हणून आईनें सांगितलें होतें आणि नारायण उत्तर देतो

आई चिंता करितों विश्वाची ॥

या विश्वाचें कल्याण कसें होईल याची चिंता अकराव्या वर्षाच्या नारायणानें केली. मला या गोष्टीची फार अपूर्वता वाटते. मी ती शंभर वेळां शंभर ठिकाणीं सांगितली असेल, पण हजार वेळां हजार ठिकाणीं ती सांगावी लागली तरी मला कंटाळा येणार नाहीं. वाचकांना आणि श्रोत्यांना माझी प्रार्थना कीं, तुम्ही हि कृपा करून तितक्या वेळां ती वाचण्याचा आणि ऐकण्याचा कंटाळा करूं नका. श्रीसमर्थांची एकंदर हयाती ७३ वर्षें १० महिने १५ दिवसांची, पण त्या अवधींत जगाच्या कल्याणाच्या चिंतेवांचून आणि कष्टावांचून त्यांचा एक हि क्षण गेला नाहीं ! हें च त्यांचें सारें चरित्र. जें अकराव्या वर्षीं त्यांनीं केलें, तें च साऱ्या जन्मभर केलें.

श्रीगुरुसमर्थ येकांतीं बैसती । प्रांतींचे लोक दर्शनासी येती ।
सकळ प्रांतींचा स्वामी परामर्ष घेती । चिंता करिती विश्वाची ॥ १
देशकाळवर्तमानें । आपण चिंताग्रस्त होती मनें ।
म्हणती कैसीं वांचतील जनें । कैसीं ब्राह्मण्यें राहतील ॥ २
कैसी क्षेम राहेल जगती । कैसीं देवदेवाल्यें तगतीं ।
कैसे कुटुंबवत्सल लोक जगती । कोणेकडे जातील हे ॥ ३

मुलाचे पाय पाळण्यांत दिसतात, असें म्हणतात. बाळपणच्या या दोन गोष्टींत श्रीसमर्थांचें अवतारकार्य उत्तम सूचित होतें; असो.

वयाच्या अकराव्या वर्षीं नारायणानें विश्वाच्या कल्याणाची चिंता करण्यास सुरुवात केली आणि बाराव्या वर्षीं

संसार मिथ्या ऐसा कळला । ज्ञान समजोन निघोन गेला ॥

प्रश्न असा, सावधान शब्द ऐकून श्रीसमर्थ सावध झाले आणि दुसरे कोणी झाले नाहीं, होत नाहीं आणि भविष्य च सांगावयाचें तर होणार नाहीं, असें कां ! कां त्यांच्या च तेवढे लग्नाचे वेळीं ब्राह्मणांनीं सावधान असा पुकारा केला आणि दुसऱ्या कोणाच्या लग्नाचे वेळीं तसा केला नाहीं, अशी कोणाची तक्रार आहे !

द्विज सावधान ऐसें सर्वत्र विवाहमंगलीं म्हणती ।
तें एक रामदासें आयकिलें

असें कां ? तो शब्द त्यांच्या च तेवढा कानीं पडला आणि बाकी आम्हां सर्वांच्या कानठळ्या बसल्या होत्या, बसतात आणि बसतील, असें कां ? याचें कारण श्रीसमर्थचरित्रावरून असें जाणतां येतें कीं, श्रीसमर्थांच्या पूर्वी त्यांच्या घराण्यांत बावीस पिढ्यांच्या पूर्वजांपासून सारखी रामोपासना चालत आली होती, म्हणून तेविसाव्या पिढीला त्या वंशवृक्षाला असलें पक्व आणि मधुर फळ लागलें आणि तें महाराष्ट्राच्या पदरीं पडलें ! ही त्यांच्या आणि आपल्या पूर्वजांची पुण्याई होय ! म्हणून मी केव्हां केव्हां कांहींसे विनोदानें पण शुद्ध भावानें श्रोत्यांना विनवीत असतो कीं, गडे हो, आपल्या कुळांत पुढला तेविसावा तरी पुरुष, कुळाचे आणि राष्ट्राचे असे पांग फेडणारा जन्मास यावा, अशी इच्छा असल्यास, कोणाच्या तोंडाकडे न पाहतां, कोणाची आशा न धरतां, कालमहिमा म्हणून कालाला दोष देऊन स्वस्थ न बसतां, जगाला जगाच्या मार्गानें जाऊं द्या, तुम्ही वेळ दवडूं नका, वाट पाहूं नका, विचार करा, आरंभ करा आणि परमेश्वरावर सारा भार टाकून निमूटपणें मार्गाला लागा.

अंगीं वैराग्य बाणून श्रीसमर्थ स्वतः सावध झाले, यास कारण जरी पूर्वजांची पुण्याई झाली, तरी साऱ्या रा ्रास सावध करण्याचें जें सामर्थ्य त्यांनीं नंतर संपादन केलें, ती केवळ त्यांची एकट्याची कमाई होय. तें सामर्थ्य त्यांच्या ठायीं कसें आलें, त्यासाठीं त्यांनीं किती कष्ट केले आणि कोणता व्याप केला, या सर्वांचें चिंतन करणें अत्यन्त बोधप्रद होय. जांबेच्या दक्षिणेस तीन कोसांवर गोदावरी आहे. श्रीसमर्थ लग्नसमारंभांतून फडकले, तसें ते गोदावरी ओलांडून दक्षिण तीरानें तिच्या उगमाकडे चालूं लागले. त्या अल्पवयी मुलाला त्या वेळीं काय वाटलें असेल, मनाशीं त्यानें काय विचार, निर्धार केला असेल, मार्गांत आणि नंतर कोणत्या अडचणी आल्या असतील, वृत्ति लवमात्र डळमळूं न देण्याइतकें पाठबळ त्यानें कोणाचें आणि कसें मिळविलें असेल, याची करवेल तशी कल्पना करावी. गोदेच्या कांठाकांठानें ते पंचवटीस जाऊन पोहचले आणि तेथें च श्रीरामचरणापाशीं स्थिरावले.

समर्थें मिठी घातली श्रीचरणकमळीं ।
येक मुहूर्त मानसपूजा संपूर्ण केली ।

मराठी ग्रंथ संग्रहालय नोंद नं. ठाणे

मराठी ग्रंथ संग्रहालय स्थळ प्रत सं. नं. ता. ठाणे.

उठोनि सप्रेमें डोळां जव देखिली ।
तंव ब्रह्मगोळीं परिपूर्ण श्रीराम पूजिला ॥

पण तिकडे ऐन घटिकेला नवरामुलगा च नाहींसा झालेला पाहून जमलेल्या वऱ्हाडी मंडळींत कोण हाहाकार झाला असेल. वृद्ध मातु:श्रींची आणि बंधूंची काय अवस्था झाली असेल ती कल्पनेनें च जाणली पाहिजे. तत्काळ सर्वत्र शोध झाला असेल, पांच पंचवीस कोसांतील गांवीं माणसें हि गेलीं असतील, पण नारायणाचा कोठें शोध लागावयाचा नव्हता आणि लागला नाहीं. रडून रडून आईचे डोळे गेले. किती हि काळ लोटला तरी आईला विस्मरण कोठून होणार, परंतु दहा पांच वर्षें गेलीं तशी आतां या जन्मांत नारायणाची पुन्हां आपणास भेट होईल अशी तिला आशा हि उरली नसावी. दु:ख करीत बिचारी स्वस्थ बसली.

इकडे नारायण मात्र स्वस्थ बसले नव्हते. पंचवटीजवळ कोस दीड कोस टांकळी म्हणून एक स्थान आहे, तेथें राहून १५४२ ते १५५४ बारा वर्षें त्यांनीं तीव्र तप केलें. तेथें गोदावरीला एक लहानसी नदी मिळते, त्या संगमापाशीं दुपारचे बारा वाजेपर्यंत त्यांनीं गायत्रीमंत्राचें पुरश्चरण करावें, नंतर पंचवटीस जाऊन माधुकरी मागावी, ती रामाला अर्पण करून सेवन करावी, तिसरा प्रहरीं स्वत:शीं किंवा समवयस्क आणि समधर्म मित्रांसमवेत लेखन, वाचन, चिंतन करावें, सायंकाळीं श्रीरामापुढें जें पुराण किंवा जी चर्चा चाले ती श्रवण करावी आणि रात्रीचा काळ आपण आणि आपला राम अशा दोघांनीं मिळून आनंदांत कंठावा. विशेष बोलणें नाहीं, चालणें नाहीं, सांगणें नाहीं, पुसणें नाहीं, क्षणोक्षणीं रामाला शरण जावें, त्यांच्या चरणीं देह अर्पण करावा, प्रेमभरें नेत्रांतून अश्रुप्रवाह चालावा, अखंड ध्यानस्थ असावें, भानावर येऊन श्रीरामाला आळवावें, सारें ब्रह्मांड आठवावें, अंत:करण पिळवटून यावें, रामा धांव अशा हांका माराव्या, क्षणांत रडावें, क्षणांत हंसावें, अशी कांहीं, तुम्हां आम्हां सारख्या बहिर्मुख प्रपंची जनांना अगम्य अशी त्या काळांत त्यांची स्थिति झाली होती. वेळ आली आणि परमेश्वराची कृपा झाली, श्रीरामचरण जोडले आणि आतां

रामाचेनि स्वामीपणें । मी हें ब्रह्मांड मानी ठेंगणें ॥

अशी कांहीं त्यांची बेगुमान, बेडर वृत्ति झाली.

याप्रमाणें परमेश्वराची कृपा संपादन करून १५५४ ते १५६६ या बारा वर्षांत तीर्थयात्रेच्या मिषानें त्यांनीं सारें भरतखंड पायाखालीं तुडविलें. वयाचीं २४ ते ३६ वर्षें म्हणजे कोणा हि माणसाच्या आयुष्यांतील अत्यन्त श्रेष्ठ असा काळ श्रीसमर्थांनीं पर्यटनांत आणि अवलोकनांत आणि अजमावण्यांत कंठिला. १५५४ ते १५६६ म्हणजे इसवी सन १६३२ ते १६४४ म्हणजे शहाजहानाची कारकीर्द चालू होती, बापाला कैदेंत टाकून आणि भावांना ठार करून औरंगजेब अजून गादीवर यावयाचा होता. अशा त्या काळांत या देशाची आणि धर्माची जी कल्पनातीत भयंकर अवनत स्थिति झाली होती ती सारी श्रीसमर्थांच्या नजरेस पडली. परमेश्वरी कृपेला पात्र झालेल्या श्रीसमर्थां सारख्या उत्कट भावनेच्या महापुरुषाला ती स्थिति पाहून काय वाटलें असेल, याचा विचार मनांत आणा. माझ्या मतें तर श्रीसमर्थांच्या भावी सामर्थ्याचा पाया या च काळांत घातला गेला. या पर्यटनामुळें च श्रीसमर्थ आणि इतर साधुसंत यांच्या प्रकृतिस्वभावांत, कार्यक्रमांत, चरित्रांत फरक पडला. पारमार्थिक दृष्टीनें मी हें बोलत नाहीं. पारमार्थिक दृष्टीनें

साधु दिसती वेगळाले । परी ते स्वरूपीं मिळाले ।
अवघे मिळोन येक चि जाले । देहातीत वस्तु ॥ ७ $\frac{२}{३१}$

पण लौकिक दृष्ट्या श्रीसमर्थ आणि इतर साधुसंत यांच्यांत आपणांस जो फरक दिसतो, त्याचें कारण केवळ श्रीसमर्थांच्या प्रत्यक्ष नजरेस राष्ट्राचे अनन्वित हाल पडले आणि इतरांच्या पडले नाहींत, हें होय. कृपा करून कोणी गैरसमज करून घेऊं नये. इतर साधुसंतांना कमी लेखण्या इतका मी पापी नाहीं, असें निदान माझें मला तरी वाटतें. ज्यांची चरणधूलि मस्तकीं धारण करून आपण पूर्वजांसहित आपला उद्धार करून घ्यावा, अशा थोर पुरुषांचा कोण उपमर्द करील ? हें माझें फरकाचें बोलणें लौकिक दृष्टीचें होय. परंतु असा हि फरक मी करावा हें इतरांच्या कैवारानें कोणास रुचणार नसेल तर, तें सोडून देऊन, श्रीसमर्थ आणि त्यांचे वडिल बंधु श्रीश्रेष्ठ असे उभयता बंधु च मी तुलनेला घेतों. श्रेष्ठ परमार्थांत समर्थांपेक्षां कमी तर नव्हते च, असले च तर कांहींसे वरचढ होते. जांबेच्या भोंवतालच्या पांच पन्नास कोसांतील जे कवि आणि त्यांचे जे ग्रन्थ माझ्या अवलोकनांत आले आहेत त्यावरून माझें मत असें झालें आहे कीं, त्या भागांतील ग्रन्थांवर श्रेष्ठांच्या भक्तिरहस्याची जी छाप पडलेली आहे, तशी ती दासबोधाची

पडलेली नाहीं. श्रेष्ठ कमी नव्हते, तरी हि लौकिक दृष्ट्या त्या उभयता बंधूंत जो फरक पडला त्याचें कारण इतकें च कीं, श्रीसमर्थांनीं देशस्थिति प्रत्यक्ष पाहिली होती आणि श्रेष्ठांनीं फार तर ती कानानें ऐकिली होती. माझ्या या मताबद्दल मजवर आतां कोण रागावणार ? परमार्थांत श्रेष्ठांना कांहींसे वरचढ म्हटलें, हें माझें म्हणणें चुकीचें असलें तरी ती आपल्या च वडिल बंधूंची स्तुति होते म्हणून श्रीसमर्थ मला क्षमा करितील आणि लौकिक दृष्ट्या मी श्रीसमर्थांचा जो गौरव करीत आहे, तो आपल्या च धाकट्या भावाचा गौरव होत आहे, म्हणून श्रेष्ठ कौतुक च करितील, रागावणार खाचित नाहींत. तात्पर्य, पाल्हाळ न करतां या ठिकाणीं इतकें च म्हणतों कीं श्रीसमर्थचरित्रांतील हा काळ अत्यन्त महत्त्वाचा असून कधीं काळीं माझ्या हातून त्यांनीं आपलें चरित्र लिहविलें तर या काळानें च त्या चरित्रांतील शें दीडशें पृष्ठें व्यापलीं जातील.

बारा वर्षें तीर्थाटनांत लोटलीं. शेवटीं हिमालयांत असतां एक क्षण असा आला कीं, हा देह ठेवून तरी काय करावयाचें आहे, अशी वृत्ति श्रीसमर्थांच्या मनांत उसळून श्रीसमर्थ हिमालयकुंडांत देह झोंकून देऊं लागले, तों श्रीरामानें वरच्या वर त्यांना धरून आज्ञापिलें कीं,

तुम्हांसी जगोद्धार करणें आहे ।
तुमची तनु ते आमुची तनु पाहे ।
दोनी तपें तुमची रक्षिला काया हे ।
धर्मस्थापनेकारणें ॥ प्रताप ३–८

श्रीरामाची ही दुसऱ्यादां सूचना झाली. श्रीसमर्थ दक्षिणेकडे उतरले. ते कृष्णातटाकीं जावयास निघाले. मार्गांत पैठणास त्यांचें कीर्तन झालें. तेथील प्रसंग सविस्तर अन्यत्र वर्णिला आहे. येथें संक्षेपानें त्याची पुनरावृत्ति करूं. कीर्तनांत कोणास त्यांची ओळख पटली आणि त्याच्या मुखानें मातुःश्रीची अवस्था ऐकून मातृदर्शनासाठीं जांबेस जाऊन श्रीसमर्थ चोवीस वर्षांनीं पुन्हां आपल्या घरापुढें उभे ठाकले. खड्या आवाजांत एक श्लोक म्हणून ‘ जयजय रघुवीर समर्थ ’ असा रघुवीराचा त्यांनीं जयजयकार केला. घरांत वृद्ध मातुःश्री मान खालीं घालून बसल्या होत्या. त्यांनीं तो श्लोक आणि तो जयजयकार ऐकला. पण त्यांना कल्पना हि झाली नाहीं कीं, आपला म्हणजे नारायण आला असेल. कोठून होणार ! चोवीस वर्षांचा काळ लोटला होता. उलट,

बाहेर कोणी गोसावी आले आहेत, त्यांना भिक्षा घाला, अशी त्यांनीं सुनबाईस आज्ञा केली. ती ऐकून ' हा गोसावी भिक्षा घेऊन जाणारा नाहीं ' असें श्रीसमर्थ बोलले. ते शब्द ऐकून मात्र आईस त्रिभुवन आठवलें आणि ' कोण, माझा नारायण आला कीं काय ' असे आतुरतेचे शब्द, डोळे पाण्यानें भरून येऊन त्यांच्या मुखावाटें निघाले. ' होय, मी नारायण आलों ' असें म्हणत श्रीसमर्थांनीं मातेच्या चरणावर मस्तक ठेवलें. काय आनंद झाला असेल, मातेच्या हृदयाची काय अवस्था झाली असेल, याची कल्पना करतां येईल तशी वाचकांनीं च करावी. मला तर वाटतें, मातृहृदयावांचून त्या आनंदाची बरोबर कल्पना दुसऱ्या कोणास व्हावयाची नाहीं. कदाचित् कांहींशी मातृभक्त पुत्राला होईल. चोवीस युगांसम चोवीस वर्षें लोटलीं होतीं. बारा वर्षांचें मूल हातून निसटलें होतें आणि आतां ध्यानीं, मनीं, स्वप्नीं नसतां छत्तीस वर्षांचा नारायण एकाएकीं प्रकट होऊन चरणीं मस्तक ठेवतो, हें स्वप्न तर नव्हे, असें आईला वाटलें असल्यास त्यांत काय नवल आहे ! डोळे गेलेले, आई चांचपून पाहूं लागली तों ती जटा आणि ती दाढी आणि तो एक एक दंड हातास लागून मातुःश्री म्हणाल्या, " नारायणा, तुझें हें रूप पाहण्यास मला डोळे उरले नाहींत. " सांगतात आणि त्या प्रसंगासंबंधानें श्रीसमर्थांचें एक पद च आहे, म्हणून मी यथार्थ मानतों कीं, श्रीसमर्थांनीं आईच्या मुखावरून हात फिरविला, तावत् श्रीसमर्थांचें नखशिखान्त स्वरूप त्यांना दृग्गोचर झालें आणि त्या म्हणाल्या, " अरे नारायणा, ही भूतचेष्टा कोठून शिकून आलास ? " नारायणानें उत्तर केलें, " आई, ही भूतचेष्टा नाहीं, सर्व प्राणीमात्रांच्या हृदयांत वास करणारा जो परमेश्वर त्याची ही कृपा होय. "

सर्वां भूतांचें हृदय । नाम त्याचें रामराय ।
रामदास नित्य गाय । तें चि भूत गे माय ॥

कथा संपली. ती थोडक्यांत सांगतां आली, पण तिच्या दसपट विस्तारानें ती घडली असली पाहिजे, ती वाचकांनीं आपआपल्या मगदुराप्रमाणें जाणावी. लग्नांतून पळाले तेव्हां श्रीसमर्थ आईला दुःखांत टाकून गेले व चोवीस वर्षें तिला त्यांनीं तसें च दुःख करीत ठेविलें, पण आतां त्या दुःखापैकीं कांहीं तरी अंश शिल्लक राहिला असेल काय ? सर्व दुःखाचा परिहार झाला असला पाहिजे. असे पोटीं पुत्र जन्मास यावे कीं, ज्यांनीं आईबापांचा हि

स्थळ प्रत
नं. ........ नं. ........

उद्धार करावं ! याप्रमाणें आईला दिव्य दृष्टि देऊन, कांहीं दिवस तिच्यापाशीं राहून, मग श्रीसमर्थ जगदुद्धारार्थ कृष्णातटाकीं गेले. किंबहुना असें म्हणतां येईल कीं, प्रथम जन्मदात्या मातेचें दुःख दूर करून व तिचा उद्धार करून मग भूमातेच्या कष्टाचा परिहार करण्याच्या कार्याला श्रीसमर्थ लागले.

हा काळ असा होता कीं, त्या वेळीं सारी जनता हताश झाली होती. राष्ट्र आणि धर्म दोन्हीं संकटांत सांपडलीं होतीं. त्यांचें रक्षण कसें व्हावें, याचा कोणास च मार्ग सुचेनासा झाला होता. काय देव करील तें खरें, असा देवावर हवाला टाकून स्वस्थ बसण्या पलिकडे गत्यन्तर उरलें नव्हतें. समर्थांच्या मुखानें देशाची दुर्धर हलाखी ऐकून श्रेष्ठांनीं तरी असे च उद्गार काढले कीं, " अरेरे, अशी कां देशाला दशा प्राप्त झाली आहे, मला वाटतें, अशा वेळीं देवाचें नांव घ्यावें आणि स्वस्थ बसावें, दुसरे कोण काय करणार,

नाहीं तरी महा भागवत नर । काय करिते ये काळीं ॥

ज्ञानेश्वरासारखे पुरुष जरी पुन्हां जन्माला आले, तरी अशा काळीं ते दुसरें काय सांगते. " श्रीसमर्थांना ही निराशेची भाषा संमत झाली नाहीं. त्यांची वृत्ति च वेगळी, प्रयत्नावर त्यांचा सारा भार.

घालून अकलेचा पवाड । व्हावें ब्रह्मांडाहून जाड ।
तेथें कैचें आणिलें द्वाड । करंटपण ॥ १२-९-२९

ही त्यांची धमक आणि तसें त्यांनीं केलें. सारी जनता मृतवत्, पाषाणवत्, दिङ्मूढ होऊन पडली असतां समर्थांनीं तिच्यांत चैतन्य उत्पन्न केलें. श्रीसमर्थांच्या चरित्रग्रन्थांत पुष्कळ च चमत्कार दिलेले आहेत व मी हि कधीं काळीं त्यांचें चरित्र लिहावयास बसलों तर चमत्काराच्या त्या सर्व च कथा अजिबात गाळीन, असें हि नव्हे. पण ही गोष्ट खरी कीं, मला त्या चमत्कारांचें मोठेंसें कौतुक वाटत नाहीं. एकादी मेलेली घार केली असेल त्यांनीं जिवंत, सती जावयास आलेल्या मुलीला ' अष्टपुत्रा सौभाग्यवती भव ' असा वर दिल्यामुळें तिच्या नवऱ्याच्या प्रेतावर गंगोदकाचें सिंचन करून, झोपेंतून जागे झाल्याप्रमाणें त्यास त्यांनीं उठविलें असेल, पण एकादी घार उठविली, किंवा एकादें प्रेत जिवंत केलें, हा चमत्कार मी मोठा मानूं, कां मेलेलें सारें राष्ट्र त्यांनीं जिवंत केलें हा चमत्कार मोठा मानूं ! श्रीसमर्थांविषयीं अत्यन्त प्रेमादर वाटण्यास मला आणि महाराष्ट्राला हा एक च मोठा चमत्कार पुरेसा आहे, असें मला वाटतें.

पाषाणीं अवेव नाना कमावीले । तैसे लोक केले । समर्थांहीं ॥ १
काष्ठीं हि अवेव नाना कमावीले । तैसे लोक केले । समर्थांहीं ॥ २
धातुला अवेव नाना कमावीले । तैसे लोक केले । समर्थांहीं ॥ ३
लोक हि पाषाण जड जीव जाण । कमाउनी पूर्ण । नीट केले ॥ ४

याला प्रमाण ? याला प्रमाण, उद्धवस्वामी म्हणतात, आम्ही स्वतः

आम्ही हि पाषाण श्रीनें कमावीलों । शिवराम जालों पावन चि ॥ ५

बाडांक ४५

असो; मातुःश्रीचें समाधान करून आणि आतां तिची परवानगी घेऊन

गंगातीरीं जो जन्मला । तो चि कृष्णातीरा गेला ।
तेथें प्रताप प्रकटला । तो धन्य साधु ॥

कृष्णातटाकीं गेल्यावर आरंभीं आरंभीं श्रीसमर्थांची वृत्ति पिसाटासारखी होती. ती कशी होती हें पहाणें असल्यास अकराव्या दशकाचा दहावा समास वाचावा. तीर्थाटनांत असतां देशस्थिति अवलोकनांत आली होती, धर्मावरील प्राणांतिक संकटाची कल्पना झाली होती, या परिस्थितीचा शेवट केला च पाहिजे असा निर्धार झाला होता, तेव्हां काय करावें ही विवंचना चालू झाली. भिक्षेपुरतें वस्तींत यावें आणि एकांतांत रानावनांत, डोंगरांत, दऱ्याखोऱ्यांत, घळींत, पाठारावर जाऊन बसावें. समुदाय कसा व्हावा, लोकांत जिवंतपणा कशानें यावा, हा निदिध्यास लागला.

अंतरीं कल्पना केली । येकांतीं बोलिलों बहु ।
रक्षिता देव देवांचा । त्याचा उत्साव इच्छिला ॥

रक्षिता देव देवांचा, रावणाच्या बंदिशाळेंत पडलेल्या तेतीस कोटी देवांना ज्यानें बंधमुक्त केलें, त्या प्रभु रामचंद्राच्या चरित्राकडे जनतेचें लक्ष वेधून घेतां येईल तर, न जाणों, अशा स्थितींत हि लोकांत चैतन्य भरेल आणि राष्ट्र आणि धर्म यांचें रक्षण होईल, असा विचार सुचून

रामकथा ब्रह्मांड भेदून । पैलाड न्यावी ॥

असा त्यांनीं निर्धार केला. मसुरास उत्सवास सुरुवात झाली, ठिकठिकाणच्या दिंड्या येऊं लागल्या, दोन तीन वर्षांत च चाफळास श्रीरामाची स्थापना होऊन राजापासून सामान्य माणसापर्यंत सर्वांचें लक्ष तिकडे लागलें, समुदाय वाढत चालला, आणि ठिकठिकाणीं मठांची स्थापना झाली.

समुदाय करण्यावर श्रीसमर्थांचा फार कटाक्ष असे. समुदाय करणें हें या संप्रदायाचें प्रमुख लक्षण होय. कोणी त्यांना भेटावयास गेला, किंवा कोणास पत्र लिहिण्याचा प्रसंग आला, तर समुदाय करण्याची गोष्ट श्रीसमर्थ प्रथम काढीत.

कांहीं समुदाव करणें । येविषीं आलस्य न करणें ।
आलस्य करितां उदंड उणें । दिसेल परमार्थीं ॥ ४
सोइऱ्याधाइऱ्याचीं मुलें । तीक्ष्ण बुद्धीचीं सखोलें ।
तयासी बोलणें मृद बोलें । करीत जावें ॥ ७
त्याचा संसार समाचार । पुसत जावा विस्तार ।
उदंड सांगतां तत्पर । होऊनि ऐकावें ॥ ८
दुःख ऐकतां दुःख जातें । त्याचें दुःख हलु होतें ।
मग तें सवें चि धरितें । मित्रभावें ॥ ९
निकट मित्री बरी होतां । मग त्यासी न्यावें येकांता ।
म्हणावें रे भगवंता । कांहीं तऱ्हीं भजावें ॥ १०
पूर्वीं देव पूजिला नव्हता । म्हणोनि आली दरिद्रता ।
याकारणें अनंता । कांहीं तऱ्हीं भजावें ॥ ११
मान्य होतां जप सांगावा । मग तो इकडे पाठवावा ।

श्रीसमर्थ आपल्या महंतशिष्यांना कशी युक्तिबुद्धि शिकवीत आहेत, पहा! अशीं तीक्ष्ण बुद्धीचीं आणि खोल अंतःकरणाचीं मुलें जवळ करा, चित्त लावून त्यांच्या सुखदुःखाच्या गोष्टी ऐका, कंटाळा करूं नका, म्हणजे त्यांना साहजिकच तुमच्याविषयीं जिव्हाळा वाटेल, अशा रीतीनें तीं पूर्ण तुमचीं झालीं म्हणजे त्यांना एकांतांत न्या, तेथें आपल्या अवनतीचीं कारणें त्यांना सांगा, व याप्रमाणें त्यांचें प्रेम तुमच्यावर जडल्यावर त्यांना मंत्रोपदेश द्या आणि मग अशा तयारीनिशीं त्यांना, जणूं हुजूरकडे म्हणजे आमच्याकडे पाठवा! आणि मग आम्ही त्यांचें काय करूं ?

मग तयाचा सकळ गोवा । उगऊं आम्ही ॥ १२ बाडांक ३५

मग त्यांना आम्ही ठोकूनठाकून, त्यांच्या ठिकाणीं अजून कांहीं किल्बिष उरलें असल्यास तें काढून टाकून त्यांना साफ करून आमच्या मनांत येईल तिकडे साऱ्या देशभर संचारार्थ पाठवूं.

नोंद नं.
स्थळ प्रत
ग्रंथसंग्रहालय ठाणे

अशा शिकवणींत तयार झालेले हजारों शिष्य आणि शिष्यांचे शिष्य जेव्हां सर्वत्र संचार करीत असतील, तेव्हां त्यांनीं राष्ट्राची केवढी कामगिरी बजाविली असली पाहिजे याची कल्पना करा. ती इतिहासांत कोठें लिहिलेली तुम्हांस सांपडावयाची नाहीं, कारण श्रीसमर्थांचा दंडक च मुळीं हा कीं,

राजकारण बहुत करावें । परंतु कळों च नेदावें ॥ ११ ५/१८

किंवा

उदंड समुदाये करावे । परी गुप्तरूपें ॥ ११ १०/१८

किंवा

आचारविचारेंविण । जें जें करणें तो तो सीण ।
धूर्त आणि विचक्षण । ते चि शोधावे ॥ १५ १/२४
उदंड बाजारी मिळाले । परी ते धूर्तें चि आळिले ।
धूर्तांपासीं कांहीं न चले । बाजाऱ्यांचें ॥ २५
याकारणें मुख्य मुख्य । तयांसी करावें सख्य ।
येणेंकरितां असंख्य । बाजारी मिळती ॥ २६
धूर्तासी धूर्त चि आवडे । धूर्त धूर्तीं च पवाडे ।
उगे चि हिंडती वेडे । कार्येंविण ॥ २७
धूर्तासी धूर्तपण कळलें । तेणें मनास मन मिळालें ।
परी हें गुप्तरूपें केलें । पाहिजे सर्व ॥ २८

फार काय सांगावें, पण ज्या श्रीकल्याणस्वामींना श्रीसमर्थांचें सारें चरित्र ठाऊक असावें अशी आपली कल्पना, ते सुद्धां

भक्तमंडळी भूमंडळीं कोणें मोजिली ॥

असें म्हणतात. श्रीसमर्थप्रतापकार गिरिधर हे श्रीसमर्थांच्या हयातींत शेवटीं शेवटीं सज्जनगडावर त्यांच्या पाशीं होते. ते स्पष्ट च सांगतात कीं,

समर्थें कित्तेक गुप्त शिष्य केले । ते ते समर्थासी विदित भले ।
भरतखंडीं प्रगट जे जाले । ते ते निवेदन करूं ग्रन्थार्थी ॥ १० × १०

असें म्हणून साऱ्या भरतखंडांतील ठिकठिकाणच्या शंभरावर महंतांचीं आणि शिष्यांचीं त्यांनीं नांवें दिलीं आहेत. त्यावरून असें दिसतें कीं, त्या वेळीं असें एक हि मोठें शहर नव्हतें, किंवा क्षेत्राचें स्थान नव्हतें, किंवा राजधानीचें ठिकाण नव्हतें, कीं जेथें किंवा ज्याच्या जवळपास श्रीसमर्थांचा मठ आणि शिष्य नव्हता.

स्थळ प्रत
नं. ........ नं. ........
ता. ........

गिरिधर हे श्रीसमर्थांच्या वेळीं श्रीसमर्थांपाशीं होते खरे, पण त्यांना प्रत्यक्ष श्रीसमर्थांचा अनुग्रह नसून श्रीसमर्थांच्या वेणाबाई, वेणाबाईच्या बाईयाबाई आणि त्या बाईयाबाईचे गिरिधर हे शिष्य होत. म्हणजे श्रीसमर्थांपासून ते चवथे पुरुष होत, ते श्रीसमर्थांचे पणतु म्हणावयाचे. या प्रमाणें श्रीसमर्थांच्या हयातींत च शिष्यांच्या अकरा पिढ्या विद्यमान असल्याचें एक उदाहरण गिरिधरांनीं श्रीसमर्थप्रतापांत दिलेलें आहे. म्हणून पंधराव्या दशकाच्या दुसऱ्या समासांत

> लोकीं लोक वाढविले । तेणें अमर्याद जाले ।
> भूमंडळीं सत्ता चाले । गुप्तरूपें ॥ १५ २/२६

हे उद्गार श्रीसमर्थांनीं निःसंशय स्वतःविषयीं काढले आहेत. तो सारा समास च श्रीसमर्थचरित्रपर आहे. तोंचसा काय, पण सबंध ग्रन्थराज श्रीमत् दासबोध हें श्रीसमर्थांचें आत्मचरित्र होय, असें मी मानतों. प्रत्येक दशकांत, समासांत, ओवींत, नव्हे प्रत्येक शब्दांत श्रीसमर्थ नटून राहिले आहेत. भूमंडळीं आमच्या समर्थांची सत्ता चालली गुप्तरूपें ! आणि आतांचे विद्वान् लोक पुरावा मागतात ! कोठून देऊं पुरावा ? पण देईन, मला विश्वास आहे ! असो;

अशा अगणित शिष्यसमुदायांत वासुदेव, उद्धव, कल्याण, दिवाकर, भीम हे जसे महंतांत प्रमुख, तद्वत् राजकारणी शिष्यांत श्रीशिवराय, बाळाजी आवजी, प्रल्हादपंत, नीळो सोनदेव, रामचंद्र नीळकंठ इत्यादि प्रमुख होत. वाद घालणारे जगाच्या अंतापर्यंत खुशाल वाद घालोत, ज्यांच्यासाठीं आणि ज्या कार्यासाठीं मुळीं श्रीसमर्थांचा अवतार त्या श्रीशिवरायाची आणि त्यांची भेट च मुळीं झाली नव्हती, पण दुर्दैवानें झाली च असेल तर फार उशिरा झाली आणि श्रीसमर्थांचा राजकारणाशीं कांहीं च संबंध नव्हता, असें मानण्यांत ज्यांचा संतोष असेल त्यांनीं खुशाल तसें मानावें. आम्ही श्रीसमर्थांचा शब्द मानूं.

> धरून पक्ष काय रे । उपाय तो अपाय रे ।
> तुम्ही तुम्हांस वीवरा । स्वहित तें मनीं धरा ॥ स्फु. श्लो. १/१०
> जनीं उदंड पाहिले । कळहो करीत राहिले ।
> अनन्य देव भेटला । कळहो तयास तूटला ॥ ११
> कळहो करील शब्द रे । अनंत तो निशब्द रे ।
> तुम्ही अनंत कां न व्हा । वेवादतां अव्हासव्हा ॥ १२

अनंत ब्रह्म तें असे । तयास पक्ष हि नसे ।
संत संत संत रे । निवांत रे निवांत रे ॥ १३
स्वयें चि तो चि होइजे । पदीं मिळोनि जाइजे ।
उरेल तो कळहो करूं । उदंड पक्ष हि धरूं ॥ १४
उदंड हो बरें बंर । तुम्ही म्हणाल तें खरें ।
कळेल तें सुखें करा । धराल तें सुखें धरा ॥ १५

तुमच्या इच्छेस येईल तसें तुम्ही खुशाल धरून चाला. आम्हांस तर श्रीसमर्थ जसे होते तसे पहावयाचे आहेत. इतर कोणी किती हि ओढाताण केली, तरी या वादांत माझी भूमिका सरळ अशी आहे कीं, माझ्या मतें श्रीसमर्थ आणि श्रीशिवछत्रपति हे दोघे हि स्वतंत्र स्वयंभु अवतारी पुरुष होत. त्या दोघांची जन्मांत हि कधीं भेट झाली नव्हती, असें जरी उद्यां सिद्ध झालें, तरी त्या दोन थोर महापुरुषांविषयीं मला वाटणारा आदर यत्किंचित् हि कमी होणार नाहीं. त्या उभयतांचा थोरपणा एकमेकांवर अवलंबून नव्हता आणि नाहीं. पण महाराष्ट्राची काय जबर पुण्याई होती कोण जाणे, हे दोघे पुरुष एका काळीं महाराष्ट्रांत अवतीर्ण झाले, एकानें स्वराज्यासाठीं स्वतंत्रपणें मुख्यत: धर्मकारण आरंभिलें, दुसऱ्यानें स्वधर्मासाठीं स्वतंत्रपणें मुख्यत: राजकारण सुरू केलें, परमेश्वराच्या इच्छेनें एकाचा धर्मकारणाचा प्रवाह आणि दुसऱ्याचा राजकारणाचा प्रवाह, असे दोन्ही प्रवाह गंगायमुनेप्रमाणें शक १५७०।७१ त परस्परांत मिसळले आणि त्यांचा पुढें जो एकच प्रचंड प्रवाह झाला तो, गंगायमुनेप्रमाणें च महाराष्ट्रास शें दीडशें वर्षें पावन करिता झाला, इतका कीं, तो प्रवाह खंडित होऊन आज शंभरावर वर्षांचा काळ लोटला तरी सुद्धां अजून त्या आनंदांत च महाराष्ट्र आनंद मानीत आहे, त्यावरून अजून त्याची दृष्टि दूर होत नाहीं !

पुनरपि रामराज्याची स्थापना व्हावी, हा जो श्रीसमर्थांच्या अवताराचा हेतु, तो सफल झाला. ते कृतकार्य झाले. १६०३ माघ वद्य ९ स त्यांनीं आपला अवतार संपविला. निश्चल अशा स्वरूपाच्या ठिकाणीं १५३० च्या चैत्र शु. ९ स जें स्मरण चेतलें, तें जरी १६०३ च्या माघ व. ९ स पुन्हां आपल्या स्वरूपीं लीन झालें, तरी तें प्रसंगीं पुनरपि केव्हां हि चेतूं शकेल. तोंवर श्रीसमर्थ गेले असें जरी आपणांस भासलें, तरी ग्रन्थरूपानें ते आज हि आपल्या जवळ आहेत च. श्रीमत् ग्रन्थराज दासबोध हें त्यांचें च स्वरूप होय. त्यांचें आश्वासन आहे कीं,

श्रीरामदेवार्चन सिद्ध चि आहे ।
श्रीग्रंथराजदासबोधसामर्थ्य सिद्ध चि पाहे ।
जो जो महंत येथें निश्चयें राहे ।
तो तो लाहे साक्षात्कारु ॥ प्रताप ९–३८

तात्पर्य, श्रीसमर्थांचें अवतारकार्य मी एका वाक्यांत मनाशीं योजिलें आहे, तें असें कीं, ( १ ) पूर्वजांच्या पुण्याईनें, ( २ ) अंगीं वैराग्य बाणून, ( ३ ) विश्वाच्या कल्याणाची चिंता वाहून, ( ४ ) स्वतः सावध होऊन, ( ५ ) देह अत्यन्त कष्टवून, ( ६ ) श्रीरामकृपा संपादन करून, ( ७ ) देशस्थिति अवलोकन करून, ( ८ ) प्रथम जन्मदात्या मातेचा उद्धार करून, ( ९ ) मग भूमातेच्या उद्धारार्थ कृष्णातटाकीं जाऊन, ( १० ) रक्षिता देवदेवांचा त्याचा उत्सव सुरू करून, (११) अवघे चि सुखी असावे । ऐसी वासना ॥ मनीं धरून, ( १२ ) ठिकठिकाणीं मठ स्थापून, ( १३ ) अगणित शिष्यसमुदाय करून, ( १४ ) त्यास परमार्थाची जोड करून देऊन, ( १५ ) व युक्तिबुद्धीनें भरून, (१६) त्यांत च श्रीशिवरायावर कृपा करून, ( १७ ) साऱ्या राष्ट्रास सावध केलें, ( १८ ) आणि रामराज्याची पुनरपि स्थापना केली, ( १९ ) इतकें च नव्हे, तर पुन्हां राष्ट्रावर तसा च काळ ओढवला तर तशा संकटसमयीं आपल्या पश्चात् मार्गदर्शक होतील, असे ग्रन्थ निर्माण करून ठेविले, ( २० ) हें श्रीसमर्थांचें अवतारकार्य होय ! अशा श्रीसमर्थचरणीं कोण वाक्पुष्पांजलि अर्पण करणार नाहीं ?

हे वीस वाक्यखंड म्हणजे जवळ जवळ कालक्रमानुसार श्रीसमर्थचरित्राच्या वीस प्रकरणांचे मथळे होत. ते एकत्र केले म्हणजे एका वाक्यांत श्रीसमर्थांचें अवतारकार्य सांगून होतें.

‘ अवतारकार्या ’ ची समाप्ती श्रीसमर्थांची प्रार्थना करून त्यांचा आशीर्वाद मिळविण्यांत झाली पाहिजे. श्रीसमर्थांनीं आपल्या समर्थापाशीं जें मागणें मागितलें होतें, तें च मागणें महाराष्ट्राचें आपल्या समर्थापाशीं आहे.

समर्थानें समर्थ करावें । तरी च समर्थ म्हणवावें ।
त्रैलोक्यास पडिलें ठावें । सामर्थ्य ज्याचें ॥

अनंत ब्रह्म तें असे । तयास पक्ष हि नसे ।
संत संत संत रे । निवांत रे निवांत रे ॥ १३
स्वयें चि तो चि होइजे । पदीं मिळोनि जाइजे ।
उरेल तो कळ्हो करूं । उदंड पक्ष हि धरूं ॥ १४
उदंड हो बरें बर । तुम्ही म्हणाल तें खरें ।
कळेल तें सुखें करा । धराल तें सुखें धरा ॥ १५

तुमच्या इच्छेस येईल तसें तुम्ही खुशाल धरून चाला. आम्हांस तर श्रीसमर्थ जसे होते तसे पहावयाचे आहेत. इतर कोणी किती हि ओढाताण केली, तरी या वादांत माझी भूमिका सरळ अशी आहे कीं, माझ्या मतें श्रीसमर्थ आणि श्रीशिवछत्रपति हे दोघे हि स्वतंत्र स्वयंभु अवतारी पुरुष होत. त्या दोघांची जन्मांत हि कधीं भेट झाली नव्हती, असें जरी उद्यां सिद्ध झालें, तरी त्या दोन थोर महापुरुषांविषयीं मला वाटणारा आदर यत्किंचित् हि कमी होणार नाहीं. त्या उभयतांचा थोरपणा एकमेकांवर अवलंबून नव्हता आणि नाहीं. पण महाराष्ट्राची काय जबर पुण्याई होती कोण जाणे, हे दोघे पुरुष एका काळीं महाराष्ट्रांत अवतीर्ण झाले, एकानें स्वराज्यासाठीं स्वतंत्रपणें मुख्यत: धर्मकारण आरंभिलें, दुसऱ्यानें स्वधर्मासाठीं स्वतंत्रपणें मुख्यतः राजकारण सुरू केलें, परमेश्वराच्या इच्छेनें एकाचा धर्मकारणाचा प्रवाह आणि दुसऱ्याचा राजकारणाचा प्रवाह, असे दोन्ही प्रवाह गंगायमुनेप्रमाणें शक १५७०।७१ त परस्परांत मिसळले आणि त्यांचा पुढें जो एकच प्रचंड प्रवाह झाला तो, गंगायमुनेप्रमाणें च महाराष्ट्रास शें दीडशें वर्षें पावन करिता झाला, इतका कीं, तो प्रवाह खंडित होऊन आज शंभरावर वर्षांचा काळ लोटला तरी सुद्धां अजून त्या आनंदांत च महाराष्ट्र आनंद मानीत आहे, त्यावरून अजून त्याची दृष्टि दूर होत नाहीं !

पुनरपि रामराज्याची स्थापना व्हावी, हा जो श्रीसमर्थांच्या अवताराचा हेतु, तो सफल झाला. ते कृतकार्य झाले. १६०३ माघ वद्य ९ स त्यांनीं आपला अवतार संपविला. निश्चल अशा स्वरूपाच्या ठिकाणीं १५३० च्या चैत्र शु. ९ स जें स्मरण चेतलें, तें जरी १६०३ च्या माघ व. ९ स पुन्हां आपल्या स्वरूपीं लीन झालें, तरी तें प्रसंगीं पुनरपि केव्हां हि चेतूं शकेल. तोंवर श्रीसमर्थ गेले असें जरी आपणांस भासलें, तरी ग्रन्थरूपानें ते आज हि आपल्या जवळ आहेत च. श्रीमत् ग्रन्थराज दासबोध हें त्यांचें च स्वरूप होय. त्यांचें आश्वासन आहे कीं,

श्रीरामदेवार्चन सिद्ध चि आहे ।
श्रीग्रंथराजदासबोधसामर्थ्य सिद्ध चि पाहे ।
जो जो महंत येथें निश्चयें राहे ।
तो तो लाहे साक्षात्कारु ॥ प्रताप ९–३८

तात्पर्य, श्रीसमर्थांचें अवतारकार्य मी एका वाक्यांत मनाशीं योजिलें आहे, तें असें कीं, ( १ ) पूर्वजांच्या पुण्याईनें, ( २ ) अंगीं वैराग्य बाणून, ( ३ ) विश्वाच्या कल्याणाची चिंता वाहून, ( ४ ) स्वतः सावध होऊन, ( ५ ) देह अत्यन्त कष्टवून, ( ६ ) श्रीरामकृपा संपादन करून, ( ७ ) देशस्थिति अवलोकन करून, ( ८ ) प्रथम जन्मदात्या मातेचा उद्धार करून, ( ९ ) मग भूमातेच्या उद्धारार्थ कृष्णातटाकीं जाऊन, ( १० ) रक्षिता देवदेवांचा त्याचा उत्सव सुरू करून, (११) अवघे चि सुखी असावे । ऐसी वासना ॥ मनीं धरून, ( १२ ) ठिकठिकाणीं मठ स्थापून, ( १३ ) अगणित शिष्यसमुदाय करून, ( १४ ) त्यास परमार्थाची जोड करून देऊन, ( १५ ) व युक्तिबुद्धीनें भरून, (१६) त्यांत च श्रीशिवरायावर कृपा करून, (१७) साऱ्या राष्ट्रास सावध केलें, ( १८ ) आणि रामराज्याची पुनरपि स्थापना केली, ( १९ ) इतकें च नव्हे, तर पुन्हां राष्ट्रावर तसा च काळ ओढवला तर तशा संकटसमयीं आपल्या पश्चात् मार्गदर्शक होतील, असे ग्रन्थ निर्माण करून ठेविले, ( २० ) हें श्रीसमर्थांचें अवतारकार्य होय ! अशा श्रीसमर्थचरणीं कोण वाक्पुष्पांजलि अर्पण करणार नाहीं ?

हे वीस वाक्यखंड म्हणजे जवळ जवळ कालक्रमानुसार श्रीसमर्थ-चरित्राच्या वीस प्रकरणांचे मथळे होत. ते एकत्र केले म्हणजे एका वाक्यांत श्रीसमर्थांचें अवतारकार्य सांगून होतें.

‘ अवतारकार्या ’ ची समाप्ती श्रीसमर्थांची प्रार्थना करून त्यांचा आशीर्वाद मिळविण्यांत झाली पाहिजे. श्रीसमर्थांनीं आपल्या समर्थांपाशीं जें मागणें मागितलें होतें, तें च मागणें महाराष्ट्राचें आपल्या समर्थांपाशीं आहे.

समर्थानें समर्थ करावें । तरी च समर्थ म्हणवावें ।
त्रैलोक्यास पडिलें ठावें । सामर्थ्य ज्याचें ॥

महाराज, समर्थांनें समर्थ करावें । तरी च समर्थ म्हणवावें ॥ हें खरें ना ? कां रामापुरतें च हें सत्य ? असें कसें असेल ? आपण हि समर्थ च म्हणविता, तेव्हां आपणांवर हि ही जबाबदारी आपल्या च सिद्धान्ताप्रमाणें येत आहे. ती आपण पार पाडली पाहिजे. ती पार पडेल, पण यांत एक अध्याहृत गोष्ट आहे ती घडली पाहिजे. रघुनाथभटाच्या निमित्तानें श्रीसमर्थांनीं महाराष्ट्रास कायमचा आशीर्वाद देऊन ठेविला आहे : 'तुमचें मन मजवरी बहुत आहे ते तुमचे आवडीच्या गुणे कल्याण होईल ऐसें नेमस्त चिन्ह दिसतें.' या आशीर्वादांत तर ती अध्याहृत गोष्ट स्पष्ट सूचित केलेली आहे. श्रीराम स्वतःस समर्थ म्हणवीत, त्याबरोबर आपले समर्थ स्वतःस श्रीरामाचा अनन्य सेवक म्हणवीत. तशी अनन्य सेवा महाराष्ट्रानें समर्थांची केली तर आज हि वरील सिद्धान्त प्रत्ययास आल्यावांचून राहणार नाहीं. तसा प्रत्यय यावा म्हणून श्रीसमर्थचरित्रग्रन्थ-संप्रदायादिकांचा चिकित्सक बुद्धीनें पण निष्ठेनें अभ्यास करण्याकडे महाराष्ट्रांतील लोकांचें-विशेषतः तरुणांचें-दिवसानुदिवस जास्त लक्ष लागावें, अशी प्रार्थना आहे.

समर्था मी तूझा तुजविण मला कोण पाहातां ।
सदा सांभाळावें जवळि च जिवामाजि राहातां ।
सुखानंदें छंदें तव गुणकथा गात वदनीं ।
विवेकाचे वाटें अघटित घडे मार्ग सदनीं ॥

श्रीसमर्थवाग्देवतामंदिर-धुळें                १८५७ पौष शु. १५

REFBK-0005446

श्रीराम

## सत्कार्योत्तेजक सभा—धुळें

# श्रीरामदासी व इतर ग्रन्थ

( १ ) श्रीमत् दासबोध, देवांच्या प्रस्तावनेसह .... रु. ३

( ३ ) श्रीरामदासांची कविता .... .... .... रु. २

( ४ ) श्रीरामीरामदासांची कविता—भक्तिरहस्य वगैरे .... रु. २

( ५ ) श्री श्लोक मनाचे—सटीक .... ... .... ०६

( ६ ) श्री स्वानुभवदिनकर ... .... .... १०१२

( ७ ) श्रीदासविश्रामधाम .... .... ... रु. ११

( १० ) श्री करुणाष्टकें .... .... .... १०८

( १२ ) श्री सीतास्वयंवर—वेणाबाई कृत .... .... ०१०

( १६ ) श्री दिनकरांची स्फुट कविता .... ... १०८

( १७ ) श्री सांप्रदायिक विविध विषय, द्वितीय खंड .... १

( १८ ) श्रीरामसोहळा—मेरुस्वामीकृत ... .... ३०८

( १९ ) श्रीसंप्रदायाचीं कागदपत्रें, द्वितीय खंड .... २

( २० ) श्री दासबोधाची किल्ली .... .... .... ०८

( २४ ) श्री हकिकतवाके--गिरिधर कृत, अपूर्व ग्रन्थ .... ०१०

( २५ ) श्रीसमर्थ कृत पदपदांतरें ... .... .... २

( २६ ) श्रीसमर्थांचें राजकारण .... .... .... ०४

( २७ ) श्रीभक्तमंजरीमाला .... .... ... ४

मालांतर्गत श्रीसमर्थपंचायतन ... .... १०८

( २८ ) श्रीरामदासी संशोधन, दोन खंड ... .... ११

( ३० ) श्री ऐतिहासिक कागदपत्रें--जेधे देशमुख ... १

( १ ) श्रीसांप्रदायिक वृत्त, चर्चा वगैरे खंड २, ३, ५, २०८

( २ ) श्रीमत् दासबोधाचे कर्ते श्रीसमर्थ च ०८

( ३ ) श्रीमत् दासबोधाची प्रस्तावना .... .... ०६

( ४ ) श्रीसमर्थांची शिकवण .... ... ०८

( ५ ) श्रीसमर्थांचें अवतारकार्य .... .... ०१

महाराज, समर्थानें समर्थ करावें । तरी च समर्थ म्हणवावें ॥ हें खरें ना ? कां रामापुरतें च हें सत्य ? असें कसें असेल ? आपण हि समर्थ च म्हणविता, तेव्हां आपणांवर हि ही जबाबदारी आपल्या च सिद्धान्ताप्रमाणें येत आहे. ती आपण पार पाडली पाहिजे. ती पार पडेल, पण यांत एक अध्याहृत गोष्ट आहे ती. घडली पाहिजे. रघुनाथभटाच्या निमित्तानें श्रीसमर्थांनीं महाराष्ट्रास कायमचा आशीर्वाद देऊन ठेविला आहे : 'तुमचें मन मजवरी बहुत आहे ते तुमचे आवडीच्या गुणे कल्याण होईल ऐसें नेमस्त चिन्ह दिसतें.' या आशीर्वादांत तर ती अध्याहृत गोष्ट स्पष्ट सूचित केलेली आहे. श्रीराम स्वतःस समर्थ म्हणवीत, त्याबरोबर आपले समर्थ स्वतःस श्रीरामाचा अनन्य सेवक म्हणवीत. तशी अनन्य सेवा महाराष्ट्रानें समर्थांची केली तर आज हि वरील सिद्धान्त प्रत्ययास आल्यावांचून राहणार नाहीं. तसा प्रत्यय यावा म्हणून श्रीसमर्थचरित्रग्रन्थ-संप्रदायादिकांचा चिकित्सक बुद्धीनें पण निष्ठेनें अभ्यास करण्याकडे महाराष्ट्रांतील लोकांचें-विशेषतः तरुणांचें-दिवसानुदिवस जास्त लक्ष लागावें, अशी प्रार्थना आहे.

समर्था मी तूझा तुजविण मला कोण पाहातां ।
सदा सांभाळावें जवळि च जिवामाजि राहातां ।
सुखानंदें छंदें तव गुणकथा गात वदनीं ।
विवेकाचे वाटें अघटित घडे मार्ग सदनीं ॥

श्रीसमर्थवाग्देवतामंदिर-धुळें

१८५७ पौष शु. १५

REFBK-0005446

## इतर ग्रन्थ

| | | |
|---|---|---|
| ( १ ) | जपानची मर्दुमकी—देवांनीं वर्णिलेली .... .... | ०८ |
| ( २ ) | आर्यलिपी—चांदोरकरांची उपपत्ति | ०८ |
| ( ३ ) | ऐतिहासिक विविध विषय, खंड पहिला .... | ५ |
| ( ४ ) | शिवकलीन घराणीं, २१ वा खंड.... ... | ३ |
| ( ५ ) | पेशवाईची अखेर .... .... ... .... | २ |
| ( ६ ) | श्री ज्ञानेश्वरी—राजवाड्यांनीं संपादिलेली .... | ४ |
| ( ७ ) | ज्ञानेश्वरींचें व्याकरण—राजवाडेकृत ... .... | १ |
| ( ८ ) | बालबोध--त्र्यंबकराय कृत .... ... .... | १ |
| ( ९ ) | महाराष्ट्रधर्म—भट कृत .... .... .... | ३ |
| ( १० ) | श्रीसमर्थांचा गाथा—अनंतदास कृत .... | १ |
| ( ११ ) | भारतवर्षाचा धार्मिक इतिहास--साने कृत .... | १ |

श्री

# रामदास आणि रामदासी

## मासिक पुस्तक

संपादक—शंकर श्रीकृष्ण देव

यांत श्रीसांप्रदायिक वृत्त, चर्चा, जीर्णोद्धार, निबंध, चित्रें, हस्ताक्षरें, ग्रन्थ, संशोधन, कागदपत्रें, अभ्यास इत्यादि उपयुक्त विषय येत असतात. वार्षिक वर्गणी ट. ह. सह ३ रुपये.

चिटणीस—सत्कार्योत्तेजक सभा, धुळें

मुंबईचे एजन्ट—परचुरे, पुराणिक आणि मंडळी, माधवबाग